Literacy for a Billion

Movie: Mothi Manse
Year: 1949

Song: Aamhi Muli Sasurvasi
Lyricist: G. D. Madgulkar

आम्ही मुली सासुरवासी

कशा जाऊ पाणीयासी
कशा जाऊ पाणीयासी
वाटेमध्ये ऋषीकेश
उभा सावळा
हरी हरी उभा सावळा
आम्ही मुली सासुरवासी

खटयाळ गं काळा मोठा
अडवूनी धरीतो वाटा
खटयाळ गं काळा मोठा
अडवूनी धरीतो वाटा
जीवघेणी बाई त्याची
बाई त्याची बाई त्याची
मुरली मंजुळा
हरी हरी मुरली मंजुळा
आम्ही मुली सासुरवासी

कदंबाच्या झाडापाठी
हरी धरी वेणू ओठी
कदंबाच्या झाडापाठी
हरी धरी वेणू ओठी
काय सांगू बाई त्याचा
बाई त्याचा बाई त्याचा
छंद आगळा
हरी हरी छंद आगळा

आम्ही मुली सासुरवासी

भुलवितो पोरी बाळी
भुलवितो पोरी बाळी
खोडी करी वेळोवेळी
भुलवितो पोरी बाळी
द्वाड पोरं नंदाचा हा
नंदाचा हा नंदाचा हा
छळीतो गोकुळा
आहा आहा छळीतो गोकुळा
आम्ही मुली सासुरवासी

लहान थोर न कळे त्याला
सदा करी भलता चाळा
आ...
लहान थोर न कळे त्याला
सदा करी भलता चाळा
पदर धरी ओढी वेणी
ओढी वेणी ओढी वेणी
तो रे वेगळा
हरी हरी तो रे वेगळा
आम्ही मुली सासुरवासी
कशा जाऊ पाणीयासी
वाटेमध्ये ऋषीकेश
उभा सावळा
हरी हरी उभा सावळा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*